सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# सातव्या दिवशीही राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

## आरोग्य सेवा विस्कळीत, मागण्यांवर तोडगा निघेना




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ ऑगस्ट**

राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांचे समायोजन करावे, मानधनात वाढ करावी, तीन वर्ष किंवा पाच वर्ष सेवा पूर्ण झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना लॉयल्टी बोनस लागू करावा या प्रमुख मागण्यांसाठी जिल्ह्यातील ५५० आरोग्य कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेसमोर मंगळवार दि १९ ऑगस्टपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे. अद्याप तोडगा न निघाल्यामुळे सातव्या दिवशीही आंदोलन सुरूच असून या आंदोलनामुळे आरोग्य सेवा विस्कळीत झाली असल्याचे दिसत आहे.


राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी येथील जिल्हा परिषदेसमोर कामबंद आंदोलन सुरू केले आहे. शासन दरबारी मागण्या मांडूनही अद्याप तोडगा निघत नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. जिल्ह्यातील साडेपाचशे कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील अशी भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेण्याचा शासन निर्णय काढला परंतु त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जुलै महिन्यात संघटनेच्या शिष्टमंडळाने आरोग्य मंत्र्यांची भेट घेऊन दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी व समायोजन प्रक्रिया यासह विविध मागण्या मान्य करण्यासाठी चर्चा केली. मात्र अद्याप कुठलाही निर्णय आरोग्य मंत्र्यांनी घेतला नाही. त्यामुळे दि १९ ऑगस्टपासून कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करीत आहेत.

आंदोलनाला जवळपास आठवडा झाला परंतु राज्य शासनाकडून कुठल्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या जात नसल्यामुळे जिल्ह्यासह राज्यातील आरोग्य सेवा विस्कळीत झाली आहे. या आंदोलनाला आता प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनीही पाठींबा दिला आहे.

या आंदोलनात शंकर तावडे, श्रीपाद गारूडी, पी एस गिरी, सचिन करेवार, नरेंद्र बुरसे, बी आर खेबाळे, पी एल कुलकर्णी, पी व्ही बेले, डॉ शारदा मेश्राम, शेख मुनाफ, बी डी शेळके, दिपक पवार आदींसह अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# मोंढा परिसरात घाणीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## सफाई करण्याचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ ऑगस्ट**

शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या नवा मोंढा परिसरातील रहीवाशांच्या घरासमोर कचरा, विष्ठा आणून टाकल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले असून रहीवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तत्काळ याठिकाणी साफसफाई करून तुंबलेल्या नाल्या मोकळ्या करण्याची मागणी येथील रहीवशांनी मुख्याधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहरातील नवा मोंढा परिसरातील रहीवशांच्या दरवाजासमोर तसेच मागील बाजूस मोठ्या प्रमाणात कचरा, विष्ठा आणून टाकल्यामुळे या भागातील नाल्या तुंबल्या आहेत. तसेच गल्लीत सगळीकडे कचऱ्याचे ढीग जमा झाले आहेत. या भागातील उपद्रवी लोकांकडून हे प्रकार घडत असून हा कचरा रस्त्यावर, नालीत पडत असल्यामुळे नाल्या तुंबल्या आहेत. तसेच काही सफाई कर्मचारी ढकलगाडीतील कचरा या ठिकाणी टाकत असल्याचे निर्दर्शनास आले आहे.

या सर्व प्रकारामुळे या भागातील रहीवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरून ये-जा करणे अवघड झाले आहे. नाल्या तुंबल्यामुळे पावसाळ्यात नाल्यातील पाणी रस्त्यावर व घरासभोवती साचत असल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव होत असून या भागातील रहीवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता आहे.

मुख्याधिकाऱ्यांनी तत्काळ या भागातील सफाई कर्मचाऱ्यांना आदेशीत करून दररोज साफसफाई करण्याचे आदेश द्यावेत तसेच कचरा न टाकण्यासंदर्भा, लघुशंका न करण्यासंदर्भात ठळक बोर्ड लावावेत किंवा ते लावण्याची परवानगी द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर ॲड राजेंद्र अग्रवाल, ॲड राजेश बियाणी, शैलेश भंडारी, संजय मुंदडा, बालप्रसाद तापडीया, संजय टाकळगव्हाकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मा. आ. गजाननराव घुगे उत्तम संघटन कौशल्याचे धनी



हिंगोली जिल्ह्यात लोकप्रतिनीधी ऊत्तम लाभले. त्यांनी सेवाभाव चांगलाच होता. पण बोटावर मोजण्या ईतकेच नेते असे मिळाले मी त्यांना ऊत्तम संघटन कौशल्य लाभले. त्यात माजी आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगेंचा समावेश होतो.. गजाननराव ह्यांचा मुळ पिंड तसा व्यावसाईक. वृतीने व्यापारी. पण आत्यंतिक मनमीळाऊ स्वभावाचे. त्यांच्या वतृत्वात आक्रमकपणा आला तो त्यांच्या रक्तातून. त्यांच्या जिवनात संयम आला तो त्यांच्या व्यापारी वृत्तीमूळे. त्यांच्या स्वभावात गोडी आली ती ज्ञानेश्वरी मुळे आणि त्यांच्या चेहर्यावर चैतन्याच तेज दिसतं ते त्यांच्या आध्यात्मिक प्रवृत्तीमुळे, परोपकार सेवा आली ती त्यांच्या आई वडीलांच्या संस्कारामुळे आणि एकात्ममाणवतावादाची प्रेरणा त्यांना मिळाली ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघा मुळे. ह्या सर्वांचा परीपाक झाला तो त्यांच्या सर्वांना सोबत घेऊन चालन्याच्या धोरनामुळे, त्यांना जे मिळाल ते त्यांना त्यांच्या स्पष्टपणे बोलण्या मुळे आणि लोभी दुरु जान्यालाही कारण आलं त्यांचा हा बाणेदारपणा, तत्वाशी तडजोड न करने हा त्यांच्या जिवनाचा भाग आणि आज त्यांची भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत, आणि प्रदेश कार्यकारिणीत एक अभ्यासू आणि कार्यतत्पर व्यक्ती असी प्रतिमा तयार झाली ती त्यांच्यातील ऊत्तम संघटन कौशल्या मुळे..

व्यापारी असल्याणे गजाननरावांचा स्वाभाविकच पहिला परिचय आला तो सहकार क्षेत्रात. आणि हिंगोलीच्या सहकार क्षेत्रात आज चार दोन माणसं आहेत जे की जानकार आहेत त्यात गजाननराव ह्यांचा नंबर दुसर्या किंवा तिसर्या स्थानी आहे. ह्याच बळावर ते मागील पस्तीस वर्षापासून हिंगोली बाजर समितिचे सभासद आहेत. आणि कित्तेक वर्षापासून ते व्यापारी संघाचे अध्यक्षही आहेत. सहकार क्षेत्रात परभणी जिल्ह्याच्या जिल्हा बँकेचे नाव हे अतिशय आदरपुर्वक घेतल्या त्या ठिकानीही गजाननराव अनेकवर्ष संचालक होते. १९९९ ते २००९ पर्यंत ते कळमनुरी विधानसभेत आमदार होते. त्यांना ती आमदारकी सहज नाही प्राप्त झाली त्यासाठीही मोठा संघर्ष होता, स्व.हिन्दुह्दिय सम्राट बाळासाहेब ठाकरे आणि स्व. गोपीनाथराव ह्यांच्या वरद हस्ताशिवाय त्यांना ती उमेदवारी मिळाली नाही. गजाननराव ज्यात क्षेत्रात रमले तिथे त्यांना योग्यते नुसार मिळाले. त्यांनी ज्यांना पाडून विधानसभेत शानदार प्रवेश मिळवला त्या काँग्रेसच्या प्रचंड मोठ्या नेत्या होत्या. कैक वर्ष त्या आमदार होत्या. मंत्री होत्या. आणि गजाननरावांचा पराभव देखिल करायला कर्णासारखी भुमीका घ्यावी लागली पक्षाच्या मुख्य नेत्यानेच सभा रद्द केली, ती सभा रद्द करायला राष्ट्रीय काँग्रेस नेत्यांना वेगळी तजबीज करावी लागली तेंव्हा तो पराभव झाला, असी जनमानसात चर्चा आहे. संघटना बळकट करनारा माणुस दुर गेल्याने काय होते हे आता सर्वांना दिसतेच आहे..

सहकार क्षेत्र, व्यापारी क्षेत्र, विधिमंडळ क्षेत्र ह्यात असुन देखील दादांनी कधीच आपली आध्यात्मिक वृत्ती कमी नाही होऊ दिली. आपल्याला जे जे मिळालं ते जनसामान्यांमुळे आणि आपल्या ज्ञानेश्वरी मुळे ह्यावर त्यांची गाढ श्रद्धा आहे. आलंदी येथील संत ज्ञानेश्वरी मंदिराचे जनक असलेले श्री केंद्रे महाराज ह्यांच्या मार्गदर्शनाखाली चालूअसलेल्या मंदिराचे गजाननराव अध्यक्ष. त्याचे काम पुर्ण तडीस नेई पर्यंत त्यांना कधीच आराम मिळाला नाही. ते काम पूर्ण करून त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रात आदर्श वस्तुपाठ तयार करून दिला. अध्यात्मिक पिंड त्यांचा केवळ इथेच थांबत नाही संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थान असलेल्या श्री नरसी नामदेव इथे ते सध्या त्या समितीमध्ये मुख्य सदस्य आहेत. परंतु या अगोदर तेथे गजाननरावांनी सामुदायिक लग्न सोहळे अनेक वेळा आयोजित केलेले आहेत. या असल्यास सामाजिक भान असल्यामुळे गजाननराव समाजामध्ये आणि समाजाशी त्यांचं नातं वृद्धीगत होत गेलं आहे. अगदी मागच्या दोन वर्षांपूर्वीच श्रीरामजन्मोत्सव अयोध्यान्यास मध्ये हिंगोलीतील कोणत्याही राजकीय नेत्यांनी जितका हिरीरीने भाग घेतला नव्हता, तेवढा वेळ गजाननरावांनी राम मंदिर समर्पणासाठी दिला. जणू काहीतरी राम मंदिराच्या निधीसाठी विस्तारकच म्हणून काम करत होते. सर्वांची काळजी घेत होते. गजाननराव यांच्याकडे अफाट क्षमता आहे. प्रचंड ऊर्जा आहे या ऊर्जेला आणि क्षमतेला पाहूनच गजाननराव घुगे यांना त्यांचे मित्र असलेले श्री देवेंद्रजी फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष श्री रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार भारतीय जनता पक्षाच्या हिंगोली जिल्हाध्यक्षपदासाठी जबाबदारी दिली. या अगोदरही माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत दादा पाटील यांनी त्यांची महाराष्ट्राच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केलीच होती. त्यांच्या अनेक राज्यांमध्ये त्यांच्यावर जबाबदारी देऊन तिथेही प्रभारी म्हणून पाठवून त्यांचे उत्तम संघटन त्या ठिकाणी पाहायला मिळालं होतं. गजाननरावांना गोवा राज्याचा सहप्रभारी सुद्धा केलं होतं. तिथेही त्यांना चांगले यश मिळाले बिहारमध्ये त्यांना पक्ष संघटन बळकट करण्यासाठी राष्ट्रीय कार्यकारिणीने पाठवलं. राजस्थान दौऱ्यावर देखील त्यांना पक्ष विस्तारासाठी पाठवलं आणि तिथेही त्यांनी आपल्या उत्तम संघटन कौशल्याला वाव मिळून देऊन पक्षाचा जनाधार वाढवला. दादांना कामात तडजोड जमत नाही, आणि तत्त्वाशी देखील ते तडजोड करत नाहीत. मग त्यासाठी नुकसान कितीही सहन करतात. कामाच्या बाबतीत दादांची किमया अतिशय भारी आहे. त्यांना कामात कसूर झाली की ते स्पष्टपणे बोलून मोकळे होतात, त्यांचा भाव काम व्हावं असाच असतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र जी चव्हाण ह्यांनी त्यांची हिंगोलीच्या भाजपाच्या जिल्ह्याध्यक्षपदी केलेली निवड त्यांनी, जिल्ह्यात सर्वांना समावेश करून घेऊन यथार्थ करून दाखवली. जिल्ह्यातही संघटनेला मोठे बळ मिळाले ते त्यांच्या उत्तम संघटन कौशल्य असल्यामुळे. दादा १९९१ नगर पालिका सदस्य, १९९३ पासून आजपर्यंत हिंगोली बाजार समिती संचालक आहेत. १९९९ ते २००९ आमदार, गोवा राज्य सहप्रभारी, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य, महाराष्ट्राचे प्रदेशाचे उपाध्यक्ष, अध्यक्ष ग्रेंड मर्चंड अशोशिएशन, अध्यक्ष जलतरण असोसिएशन, हतिहरनाथ संस्थान अध्यक्ष, राज्य केथिलिक संघ सदस्य, पंधरा वर्ष मध्यवर्ती बँक संचालक, हळद असोसिएशन अध्यक्ष, मराठवाडा कॉमर्स उपाध्यक्ष, विठ्ठलराव घुगे एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष दादा आहेत, सामाजिक, आध्यात्मिक, राजकीय, सैक्षनिक, क्रीडा, प्रत्येक क्षेत्रात दादांचं काम आहे. मोठ संघटन आहे...

सर्व क्षेत्र सांभाळून कुटुंबात एक वडील, आजोबा, पती, सासरा, भाऊ, मामा, म्हणून देखील प्रत्येक नात्यात दादा कायम पुढे असतात. प्रत्येक राजकारण्याच्या जीवनात ही नाती आणि त्यांचं प्रेम असतंच असं नाही पण दादा त्यालाही अपुवाद आहेत. त्यांना सर्वांचं प्रेम आणि आपुलकी आहे. श्रीमंताच्या पेक्षा दादा गरिबात जास्त रमतात. कारण ते नेहमी जमिनीवर असतात. कितीही घाई असली, कितीही गर्दी असली तरी त्यांच्या निवासस्थानी कोणताही व्यक्ती कधीही बिना चहाचा गेला नाही, जात नाही. कोणतेही लोकप्रतिनिधी नसताना सामान्य माणसांचं प्रेम लाभन हे ही भाग्याणेच मिळत, आणि हे भाग्य दादांचं आहे. त्याच बळावर ते पक्षाचं संघटन उभ करत आहेत, आणि त्यांना त्यात याशही येत आहे. कोणालाही जवळ गेल्यावर प्रेम आणि आपुलकी वाटावी असा नेता म्हणजे गजाननराव घुगे आहेत. आज त्यांच्या जन्म दिनाच्या शुभेच्छा देत असताना परमेश्वराला एकच प्रार्थना करेल, समाजाला आपला समजणारा हा राजकारणी योग्य तिथे असावा आणि कायम स्वाभिमान जपत त्यांना ते ते इच्छित मिळावं ह्यासाठी देवाकडे प्रार्थना करतो आणि निरोगी आरोग्यासाठी आणि कार्यरत दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतो.




**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात मंगळवारी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. गजाननराव घुगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शिवदास बोड्डेवार, पांडुरंग पाटील, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

# हिंगोली तहसील कार्यालयात जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ ऑगस्ट**

येथील तहसील कार्यालयाच्या परिसरातील मोकळ्या जागेत मागील अनेक वर्षांपासून धूळ खात पडलेले ट्रॅक्टर आणि रेतीचे हायवा वाहने अखेर लिलावात विक्रीसाठी ठेवण्यात आले. शासनाच्या आदेशानुसार, अनेक वर्षांपासून पडून असलेल्या या वाहनांचा लिलाव आज पार पडला. यामुळे, ही वाहने खरेदी करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

गेल्या अनेक वर्षांपासून या जागेवर बेवारस स्थितीत पडलेली वाहने, केवळ जागा अडवत होती. त्यांची दुरुस्ती करणेही शक्य नव्हते, त्यामुळे ती तशीच पडून होती. मात्र आता शासनाने या वाहनांचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे एकीकडे शासनाला महसूल मिळणार आहे, तर दुसरीकडे कित्येक वर्षांपासून अडकून पडलेली ही जागा मोकळी होणार आहे.

मंगळवार दि २५ ऑगस्ट रोजी लिलावाची प्रक्रिया सुरू होताच, परिसरातील नागरिक आणि वाहन खरेदीदार मोठ्या संख्येने जमा झाले होते. कमी किंमतीत ही वाहने मिळाल्याने अनेकांनी ती खरेदी करण्यास रस दाखवला. लिलावामुळे ही वाहने पुन्हा एकदा रस्त्यावर धावतील आणि ज्या जागेवर ती धूळ खात पडली होती, ती जागा आता मोकळा श्वास घेईल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# पवार इंग्लीश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बनविले शाडू पासून आकर्षक गणपती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २६ ऑगस्ट**

आजपासून गणेशउत्सवाला सुरुवात होत आहे. त्यामुळे येथील पवार इंग्लिश स्कुलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी माती आणि वाळूच्या मदतीने शाडूचे आकर्षक गणपती तयार केले आहेत.

दरम्यान, प्लास्टर ऑफ प्यारीस पासून गणेश मुर्त्या तयार केल्या जातात त्यामुळे विसर्जन करताना पर्यावरणाचा ऱ्हास होतो. पर्यावरणाचे संतुलन बिघडते, त्यामुळे पर्यावरण प्रेमी कडून रासायनिक रंगा पासून गणेश मूर्ती न बनवता त्या शाडू मातीपासून तयार करा असा आदेश असतानाही बाजारात सरास पणे प्लास्टर ऑफ प्यारीस पासून तयार केलेल्या मूर्तिची विक्री केली जात आहे. त्यामुळे पर्यावरण संतुलित राहण्यासाठी पवार इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांनी माती आणि वाळूचा वापर करीत आकर्षक गणेश मुर्त्या तयार केल्या आहेत. त्यांचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे. या विद्यार्थ्यांनी प्लास्टर ऑफ प्यारीसच्या मुर्त्या एवजी वाळू पासून तयार केलेल्या किंवा शाडू मातीपासून तयार केलेल्या मुर्त्यांची स्थापना करण्याचा संदेश दिला आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आज खऱ्या अर्थाने शाडू माती पासून तयार केलेल्या गणेश मुर्त्या स्थापन करण्याचा संदेश यातून दिला आहे. यासाठी प्रचार्य प्रणव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन लाभले आहे.